स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
निवडणुकांकरीता मतदान केंद्र निश्चितीच्या
निकषांमधील सुधारणा

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in
दिनांक - २९ ऑगस्ट, २०२५

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५,दि. २६ जून, २०२५.

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदान केंद्रांबाबतच्या निश्चितीबाबतचे निकष ठरवून दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने राज्यात विभागवार आढावा बैठका घेतल्या असता प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता बऱ्याच जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी व्यक्त केली.

आणि ज्याअर्थी उपलब्ध असलेले मनुष्यबळ, मतदान यंत्रे इत्यादी सर्व बाबींचा विचार करता आगामी निवडणुकांकरीता मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांच्या संख्येमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ च्या कलम ९-ए(४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग खालील प्रमाणे सुधारीत आदेश देत आहे. :-

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन आदेशातील मुद्दा क्र. १ ( iii ) मध्ये नमूद केलेली मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे. :-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | प्रभाग पध्दती | मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | एक सदस्यीय | ११०० ते १२०० |
| २ | इतर महानगरपालिका | एक सदस्यीय | ११०० ते १२०० |
| | | द्विसदस्यीय | १००० ते ११०० |
| | | त्रिसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | चार सदस्यीय | ८०० ते ९०० |
| | | पाच सदस्यीय | ७०० ते ८०० |
| ३ | नगरपरिषद | एक सदस्यीय | ११०० ते १२०० |
| | | एक सदस्यीय (थेट अध्यक्षासह) | १००० ते ११०० |
| | | द्विसदस्यीय | १००० ते ११०० |
| | | द्विसदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ९०० ते १००० |
| | | त्रिसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | त्रिसदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ८०० ते ९०० |
| ४ | नगरपंचायत | एक सदस्यीय | ११०० ते १२०० |
| | | एक सदस्यीय (थेट अध्यक्षासह) | १००० ते ११०० |
| ५ | जिल्हा परिषद / पंचायत समिती | एकत्र निवडणूक | १००० ते ११०० |
| | | स्वतंत्र निवडणूक* | ११०० ते १२०० |
| ६ | ग्रामपंचायत | बहुसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | बहुसदस्यीय (थेट सरपंचासह) | ८०० ते ९०० |

* जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती यापैकी एकाच पदाची निवडणूक असल्यास वर स्वतंत्र निवडणूक असे नमूद आहे त्यानुसार मतदार संख्या ठेवावी.

टीप १ - पोटनिवडणूक असल्यास किती पदांची निवडणूक आहे त्यानुसार मतदार संख्या ठेवावी.

| | |
|---|---|
| टीप २ - दुर्गम भाग/विरळ लोकवस्ती अथवा विखुरलेल्या वाड्या, वस्त्या व तांडे यामध्ये कमी लोकसंख्येकरीता देखील मतदान केंद्र ठेवता येईल. | |
| टीप ३ - मतदान केंद्रास जोडावयाच्या कमाल आणि किमान संख्येमध्ये स्थानिक परिस्थिती व मागील निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार १० % कमी अथवा अधिक मतदार जोडता येतील. | |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२८.०८.२०२५

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत.